Click Here & Upgrade
Expanded Features
Unlimited Pages
PDF Complete

CCPS CENTER FOR CHEMICAL PROCESS SAFETY
An AIChE Industry Technology Alliance

Process Safety Beacon

http://www.aiche.org/CCPS/Publications/Beacon/index.aspx
उत्पादन क्षेत्रातील व्यक्तिंसाठी संदेश

CCPS च्या समर्थकांकडून प्रायोजित

# कारखान्यांचे संरक्षण

सप्टेंबर २००८



अमेरिकेवर सप्टेंबर २००१ मध्ये झालेल्या अतिरेकी हल्ल्याच्या वर्षदिनी आपल्या लक्षात येईल की, न्यूयॉर्क व वॉशिंग्टनच्या हल्ल्यापूर्वी व नंतरही असे हल्ले जगभरात इतर अनेक ठिकाणी झाले. (उदा. टोकयो भुयारी मार्ग; लंडन, माद्रीद; बाली, इंडोनेशिया, अहमदाबाद; भारत, रशियातील काही हल्ले, मध्य पूर्वेतील काही देशांतील घटना). असे थोडेच देश आहेत की ज्यांनी दहशतवादी हल्ले व आनुषंगिक नुकसान यांचा अनुभव घेतलेला नाही. प्रक्रीया उद्योगांमध्ये हाताळण्यात येणाऱ्या पदार्थांच्या घातक गुणधर्मांमुळे प्रत्येक कर्मचाऱ्याने सदैव दक्ष राहून स्वतःच्या, आपल्या सहकाऱ्यांच्या व शेजारील उद्योगांच्या सुरक्षेची खात्री करणे आवश्यक आहे आपण जर रसायन स्टोरेज किंवा प्रक्रीया संयंत्रात काम करीत असाल तर तुमच्या प्लँटच्या संरक्षणातील संभावित कमतरता किंवा उणीवा ओळखून त्यावर कृती करण्याच्या दृष्टीने तुम्ही योग्य व्यक्ति असता. संरक्षणातील संभावित उणीवा शोधा आणि त्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास आणा म्हणजे त्यांत सुधारणा करता येऊ शकेल.

## आपण काय करु शकता ?

तुम्ही प्लँटमध्ये दररोज काम करता त्यामुळे संरक्षणातील संभावित समस्या ओळखण्याची आपणास संधी असते; त्या शोधा व वरिष्ठांच्या निदर्शनास आणा. इथे काही उदाहरणे दिली आहेत. तुम्ही आणि तुमचे व्यवस्थापन याहीपेक्षा मोठी यादी बनवू शकता.

- सिक्यूरिटी लाइट, जे पेटत नसणे किंवा जर पेटत असतील तर अपुरे असणे.
- प्लँटभोवतालच्या कुंपणावरील गेटचे कुलूप तुटलेले असणे.
- सैल गेट किंवा गेटच्या खाली खूप मोकळी जागा असणे.
- कुंपणामधे किंवा खाली मोकळी जागा, तुटलेले कुंपण, खूप कमी उंचीचे कुंपण, कुंपणाखालील जमिनीची धूप.
- वुंपणाजवळ बाहेरच्या बाजूने एखादी वस्तू असणे ज्यामुळे कुंपणावर चढणे शक्य होते.
- चेन व कुलूप व्यवस्थित लावलेले नसणे.
- प्लँटच्या सीमेवरील कुंपणाचे गेट, दरवाजे, किंवा खिडक्या उघड्या असणे किंवा अर्धवट उघड्या असणे.
- बाहेरील दरवाजे व खिडक्या पूर्ण न लागता मधेच अडकणे.

तसेच तुम्ही आपल्या कारखान्यातील सुरक्षा पद्धतीची माहिती घेऊन अंमलबजावणी करावयास हवी. उदाहरणार्थ –

- आवश्यक ओळखपत्र नेहमी वापरा आणि जर आपणास कोणी व्यक्ति ओळखपत्राशिवाय आढळली तर आपल्या सुपरवायझरला किंवा सिक्यूरिटी ऑफीसरला सांगा.
- तुमचे प्लँटमध्ये प्रवेश करण्यासाठीचे कार्ड किंवा ओळखपत्र अन्य कोणासही देऊ नका.



झाडे आणि झुडुपांनी दाट झालेले कुंपण



कुंपणाजवळ उभ्या केलेल्या कारमुळे कुंपणावर चढण्यास मदत होते



जाळीच्या कुंपणात अडकवलेले कुलूप – कुंपणाच्या खांबाला साखळी गुंडाळून लावलेल्या कुलुपाइतके मजबूत नाही.

**कारखान्याचे संरक्षण ही प्रत्येकाची जबाबदारी आहे!**

AIChE © 2007. सर्वाधिकार सुरक्षित. अव्यावसायिक व शैक्षणिक हेतूसाठी पुनरुपयोगास प्रोत्साहन आहे. तथापि CCPS शिवाय अन्य कोणत्याही व्यक्ति अथवा संस्थेने विक्री करण्यास सक्त मनाई आहे. संपर्क: ccps_beacon@aiche.org किंवा २१२.५९१.७३१९

हा दीपस्तंभ अफ्रीकन, अरेबिक, चिनी, डॅनिश, डच, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन गुजराथी, हिब्रू, हिंदी, हंगेरियन, इंडोनेशियन, इटालियन, जपानी, कोरियन, मलय, मराठी, पर्शियन, इटालियन, पोलीश, पोर्तुगिज, रशियन, स्पॅनिश, स्वीडीश, तमिळ, थाई, तुर्की, आणि आणि व्हीएतनामी इत्यादी भाषांमध्ये उपलब्ध आहे..

This document is translated in Marathi by Mr. S.K. Gulawani of Excel Industries Limited, Maharashtra, India